**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सतीशचंद्र बाळकृष्ण कांबळे<br>रा. एफ.ओ. ४, उत्कर्ष रेसीडेन्सी, फाळके आय हॉस्पिटल जवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर-३ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | पोलीस उपअधीक्षक (मु.) कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | हजर |

ध्वनि-प्रदूषणाच्या अनुषंगाने सन २००६ व २००७ मध्ये गणेशत्सवादरम्यान किती मंडळांवर कार्यवाही केली, गणपती विसर्जनामुळे नदी/तलाव यातील पाण्याचे प्रदूषण होते, त्याबाबत कोणावर कार्यवाही केली, याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. सतीशचंद्र बाळकृष्ण कांबळे यांनी मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु.) कोल्हापूर यांनी विलंबाने माहिती दिली. माहिती प्राप्त झाली आहे. ४२ दिवसांचा विलंब झाल्याने शास्ती व्हावी, अशी श्री. कांबळे यांची मागणी आहे.

'सदर कालावधीत महत्वाचा गणेशोत्सव बंदोबस्त, अतिमहत्वाच्या ग्रामपंचायत निवडणूकीचा बंदोबस्त, महत्वाच्या व्यक्तींचे दौरे बंदोबस्त, तसेच साखर कारखाना बंदोबस्त इत्यादी महत्वाच्या कामामध्ये व्यस्त राहिल्याने माहिती देण्यास विलंब झालेबाबत खुलासा सादर केलेला आहे. अपीलकर्ता यांना माहिती देण्यामध्ये विलंब झाल्याबाबत संबंधितांनी केलेला खुलासा योग्य व समर्थनीय आहे,' असे स्पष्टीकरण अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर श्री. सी.जी. कुभांर यांनी आयोगास सादर केलेल्या निवेदनात केले आहे, ते स्वीकारण्यात येत आहे. मात्र कामाच्या

ताणाचे कारण ही माहिती विहित मुदतीत न देण्याची किंवा नाकारण्याची सबब ठरता कामा नये, याची दक्षता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाचे वेळी घेण्यात यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१४.०५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७ / सांगली | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती नंदा डी. नातू<br>द्वारा श्री. मनोज मुळे, हरे कृष्ण ॲटो सेंटर,<br>मंगळवार पेठ, मिरज, जि. सांगली | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,<br>तासगाव, जि. सांगली | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | वरिष्ठ लेखाधिकारी,<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ३ रा मजला,<br>सिडको भवन, दक्षिण कक्ष,<br>नवी मुंबई -४०० १६४ | हजर |

अपीलकर्त्या श्रीमती नंदा डी. नातू यांनी श्री. दिलीप गोविंद नातू, वरिष्ठ लिपिक यांचे नियत वयोमानानुसार निवृत्ती वेतन प्रस्ताव मंजुरीबाबत माहिती मागितली होती.

वरील तीन घटकांमधील चर्चेअंती अपीलकर्त्याने आवश्यक माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकाऱ्याने माहिती अर्जास विहित मुदतीत उत्तर देण्याची खबरदारी घ्यावी.

**पुणे**
**दि.** ३०.८.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

श्री.नागनाथ नरसप्पा कुंभार
२८३ ब, मंत्रीचंडक पार्क, विजापूर रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री स्वामी समर्थ प्रशाला अरळी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२९ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागनाथ नरसप्पा कुंभार
२८३ ब, मंत्रीचंडक पार्क, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.८.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| --- | --- |
| | १. श्री बृहन्मठ होटगी संचलित शैक्षणिक संस्थेतील दि.८.८.१९८० पासून ते माहे एप्रिल २००६ पर्यंतची अद्ययावत, विविध शाळेत कार्यरत असणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता यादी<br>२. श्री.कुंभार नागनाथ नरसप्पा(सहशिक्षक )बीए बीएड यांची नेमणूक दि.८.८.१९८० पासून माहे एप्रिल २००६ पर्यंतचे सेवापुस्तिकेची अद्ययावत दुय्यम प्रत. दि.८.८.१९८० पासून पगारपत्रकाची दुय्यमप्रत.<br>३. श्री स्वामी समर्थ प्रशाला अरळी, ता.अक्कलकोट ही शाळा अल्पसख्यांक दर्जा प्राप्त झाला आहे काय, असल्यास कोणत्या संस्थेच्या अंतर्गत आहे. प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, सध्या कार्यरत असलेले शालेय समितीची साक्षांकित यादी. |

## विवेचन

श्री बृहन्मठ होटगी संचलित शैक्षणिक संस्थेतील ऑगस्ट १९८० ते एप्रिल २००६ पर्यंतची संस्थेबाबतची व संस्थेच्या अन्य शाळांमधील माहिती अपीलकर्ता श्री. नागनाथ नरसप्पा कुंभार यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री स्वामी समर्थ प्रशाला, अरळी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. संस्थेच्या इतर शाळांचीही माहिती विचारली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र संस्थेकडे पाठविले व संस्थेने माहिती दिली. परंतु खोटी माहिती दिल्याचा आक्षेप घेऊन श्री.कुंभार यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. अपिलाच्या सुनावणीला मुख्याध्यापक उपस्थित राहिले नाहीत, परंतु श्री.कुंभार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना बिनचूक माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिला व अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वेळापत्रकातील तास, सेवाज्येष्ठता यादी आदी संदर्भात माहितीत त्रुटी आहेत, वेळापत्रक चुकीचे आहे, सेवाज्येष्ठता व शालेय समितीच्या यादीत प्रत्येक पानावर साक्षांकन केलेले नाही, अशा प्रकारे आपल्याला मिळालेली माहिती अपुरी आहे असे श्री.कुंभार यांनी

आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. श्री.कुंभार यांचा अर्ज आल्यानंतर संस्थेच्या अन्य शाळांशी संबंधित माहिती मागितली असल्यामुळे मुख्याध्यापक श्री.कुरसिध्द बाबूराव पाटू यांनी अर्ज संस्थेकडे पाठविला. तसेच संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडेही पाठविला व तसे श्री.कुंभार यांना कळविले. त्याच्या प्रती मुख्याध्यापक यानी सादर केल्या. सुनावणीबाबतचे पत्र आपल्याला उशिरा मिळाल्यामुळे आपण अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे उपस्थित नव्हतो. परंतु माहिती प्राप्त करुन घेऊन श्री.कुंभार यांना आपण शुल्क कळविले व त्यांनी शुल्क भरल्यानंतर संपूर्ण माहिती अचूक त्याना दिली, असे मुख्याध्यापक श्री.पाटू यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले. माहिती खोटी असल्याचे श्री.कुंभार यांनी म्हटले असले तरी त्याबाबतचे पुरावे त्यांनी दिलेले नाहीत. संस्थेने कळविलेली माहिती योग्य असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी नमूद केले. श्री.कुंभार यांचे दोन महिन्याचे वेतन संस्थेने काढलेले नाही हा मुख्य प्रश्न असल्याचे आयोगापुढील सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले व हे वेतन काढण्यात आले असल्याचे श्री.वीर यांनी स्पष्ट केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.८.२००८

ऑगस्ट-०८-५०-५२

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३२ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. नागनाथ उध्दव कदम<br>मु.पो.उपळाई (खु.) ता. माढा, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत उपळाई (बु.) ता. माढा, जि.सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डूवाडी,<br>ता. माढा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. नागनाथ उध्दव कदम यांनी सन १९९९ ते २००३ मध्ये सर्वश्री किसन पछिंद्र वाकडे, सुरेश बळीराम शिंदे, पोपट बळीराम शिंदे हे सर्व उपळाई बु. येथील रहिवासी असून त्यांना घरकुल कोणत्या साली मिळाले, त्याबाबत रक्कम, चेक नंबर, बँकेचे नाव याबाबत माहिती मागितली होती.

आपणास मूळ अर्जाच्या अनुषंगाने माहिती मिळाली असल्याचे व त्या माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने दि. ५.११.२००७ रोजी आयोगास लेखी कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १२ .८.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. तुकाराम मारूती सरडे<br>३/२४, शिवाजीनगर (मोदी) जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. तुकाराम मारूती सरडे यांनी सन १९८४ ते माहे २००६ मध्ये उजनी धरणाच्या लाभक्षेत्रात पुनर्वसनासाठी संपादन झालेल्या, परंतु न्यायप्रविष्ट झालेल्या जमिनीच्या अंतिम निर्णयाची सद्यस्थिती व इतर मुद्दयांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली नाही, ती मिळण्याची शक्यता वाटत नाही, कारण सदरची कागदपत्रेच कार्यालयात उपलब्ध नाहीत, असे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. अपीलकर्त्यास कार्यालयात उपलब्ध असलेली एकूण १६७७ पानांची माहिती यापूर्वी विनामूल्य दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले.

श्री. तु.मा. सरडे यांनी मागणी केलेली संपादनाची माहिती ही अंदाजे ३० ते ३५ वर्षांपूर्वीची असून तसेच पुनर्वसन कार्यालयातील अभिलेखास वाळवीचा प्रादुर्भाव झाल्याने त्यात बरेच अभिलेख जीर्ण झाले आहेत. तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती अत्यंत क्लिष्ट व जुनी असल्याने त्यापैकी जिल्हा पुनर्वसन कार्यालयात व पुनर्वसन अधिकारी, पंढरपूर या कार्यालयात संपादनाबाबतची उपलब्ध असलेली सर्व माहिती अर्जदार यांना दि. २५.१०.२००७ रोजी देण्यात आलेली आहे. ऊर्वरित मुद्दयावरील माहिती ही या

कार्यालयातील नसल्याने ती संबंधित विभागाकडून मागणी करण्यात येऊन जसजशी माहिती प्राप्त झाली तसतशी ती अपीलकर्ता यांना मोफत देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.६.२००८ च्या निवेदनात लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर,पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५८/ सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपील कर्ता | श्री. सीताराम कड्याप्पा गुंड<br>मु.पो.सावळेश्वर, ता. मोहोळ,<br>जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हा पुरवठा अधिकारी , सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. सीताराम कडयाप्पा गुंड यांनी मौजे सावळेश्वर येथील स्वस्त धान्य दुकानासंबंधी दि.३.१०.२००५ रोजी लोकशाही दिनी दिलेल्या तक्रारीवर काय कारवाई केली, त्याच्या छायांकित प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांच्याकडे दि.१९.८.२००६ रोजी केली होती. तहसीलदार, मोहोळ यांच्याकडून माहिती घ्या, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.९.२००६ रोजी कळविले. त्या विरूध्द श्री. गुंड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी यांनी स्वतः कार्यवाही केली नाही, तसेच तहसीलदारांकडे अर्ज पाठविला नाही, म्हणून तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर कारवाई करावी, असे अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री मधुकर आर्दड यांनी दि.१४.११.२००६ रोजी प्रथम अपिलावर दिलेल्याआदेशात म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.११.२००७ रोजी माहिती दिली. माहिती देण्यास ५८ दिवस विलंब झाल्याने ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) माहिती देण्यास ५८ दिवसांचा विलंब झाल्याने प्रतिदिनी रू. २५०/- प्रमाणे रू.१४५००/- शास्ती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांना लावण्यात येत आहे. या तत्कालीन अधिकाऱ्यांकडून ही शास्ती ऑक्टोबर महिन्यात मिळणाऱ्या सप्टेंबर महिन्याच्या वेतनातून वसूल करून तीं दि. २०.९.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा,६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपर जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. मा.गो.मांडूरके यानी करून तसा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

पुणे
दि.२८.०८.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सचितानंद चोखू कडलक<br>मु.पो.कोरेगाव भिमा, ता. शिरूर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, शिरूर,<br>ता. शिरूर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. सचितानंद चोखू कडलक यांनी तहसील कार्यालय, शिरूर अंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात दि. १.१.२००६ ते ३१.३.२००६ या कालावधीत रस्ता मागणीसाठी किती अर्ज प्राप्त झाले, त्या अर्जदारांचे नाव व पत्ते, तसेच या अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा तपशील इ. बाबतची माहिती मागितली होती.

श्री. कडलग यांचा अर्ज दि. १०.५.२००६ रोजीचा असून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर यांनी विहित मुदतीत उत्तर दिले नाही. त्यामुळे श्री. कडलग यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दि. २२.६.२००६ रोजी अपील केले. मूळ अर्जच मिळाला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर यांनी सांगितले. परंतु योग्य ते शुल्क आकारून सात दिवसांत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांनी दि. ११.८.२००६ रोजी दिला. त्यानंतर तेरा दिवसांनी दि. २४.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली. तीही अपुरी व दिशाभूल करणारी असल्याचे श्री. कडलग यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात म्हटले आहे.

मूळ अर्ज मिळाला नाही, हे जन माहिती अधिकाऱ्यांच्या म्हणण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांनी भाष्य केलेले नाही. मात्र तसे मान्य केले तरी अपिलीय प्राधिकाऱ्यांनी

अपिलाच्या दि. २८.७.२००६ च्या सूनावणीची सूचना दि. १९.७.२९९६ रोजी दिली होती, तेव्हा जन माहिती अधिकाऱ्यांना या अर्जाबाबत कळले, असे गृहीत धरले तरी व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयातील सात दिवसांची मुदत मान्य केली तरी माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी पाच दिवस विलंब केला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरूर श्री. अे.के. देशमुख शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहिती देण्यास पाच दिवसांचा विलंब केल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. अे.के. देशमुख यांना रू. १२५०/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती सप्टेंबर महिन्याच्या व ऑक्टोबर २००८ या महिन्यात देय असलेल्या वेतनातून वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७० / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दत्तात्रय यादव हिरडे<br>मु.पो.पोथरे, ता. करमाळा, जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पोथरे,<br>ता. करमाळा, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, करमाळा, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय यादव हिरडे यांनी सन १९९०-२००६ या कालावधीतील जमाखर्च पत्रक, घरकुल लाभधारक यादी, घरदुरूस्ती लाभधारक यादी, विहिरी यादी, जुने पत्रे, दांड्या, जुने पाईप, दरवाजे, मोटारपंप, वार्षिक जमाखर्च पत्रक इ. माहिती मागितली होती.

आपल्याला आवश्यक माहिती मिळाली असल्याने कोणतीही तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने वरील तीनही घटकांनी चर्चेअंती सादर केलेल्या निवेदनात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. 30 .८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**